# देवळात देवतेचे प्रत्यक्ष दर्शन घेण्यापूर्वीच्या कृतींमागील शास्त्र

## विषयसूची

卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ६

卐 आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ११

卐 ग्रंथमालिकेचे सामाईक मनोगत १४

## ग्रंथाची अनुक्रमणिका

**१. देवळाचे महत्त्व** १५

१ अ. भक्तीयोगानुसार महत्त्व १५

१ आ. ज्ञानयोगानुसार महत्त्व १६

१ इ. देवळामुळे दशदिशा चैतन्यमय होणे १६

**२. देवळात दर्शन घेण्याचे महत्त्व** १८

**३. ‘मंदिर’पेक्षा ‘देऊळ’ किंवा ‘देवालय’ हे शब्द का वापरावेत ?** १९

**४. देवळाच्या रचनेतील सात स्तर, त्यांच्याशी संबंधित तत्त्वे आणि त्यांचे महत्त्व** २०

**५. देवळात दर्शन घेण्याची योग्य पद्धत** २१

**६. देवळात प्रवेश करण्यापूर्वी करायच्या कृती अन् त्यांमागील शास्त्र** २५

६ अ. देवळात प्रवेश करण्यापूर्वी अंगावरील चामड्याच्या वस्तू काढून का ठेवाव्यात ? २५

६ आ. देवळात प्रवेश करण्यापूर्वी चपला अन् जोडे काढून का ठेवावेत ? २६

६ इ. पाय धुऊन देवळात प्रवेश का करावा ? ३२

६ ई. पाय धुतल्यावर स्वतःवर जल का शिंपडावे ? ३२

६ उ. देवता आणि गुरु यांचे दर्शन घेतांना, पूजा, नमस्कार, जप अन् हवन करतांना आणि प्रदक्षिणा घालतांना गळ्याला वस्त्र का लपेटू नये ? ३४

६ ऊ. काही देवळांमध्ये ‘पुरुषांनी अंगरखा (शर्ट) काढून देवळात प्रवेश करावा’, असा नियम का आहे ? ३५

६ ए. देवळात दर्शनाला जातांना डोके झाकणे हे योग्य कि अयोग्य ? ३६

६ ऐ. देवळाचे प्रवेशद्वार, सभामंडप आणि गर्भगृह यांत प्रवेश करण्यापूर्वी द्वाराला नमस्कार का करावा ? ३७

६ ओ. देवळाच्या आवारातून कळसाचे दर्शन का घ्यावे ? ३९

**७. देवळात दर्शनासाठी आवारातून सभामंडपाकडे जाण्याची पद्धत ४१**

७ अ. नमस्कार करत जाणे ४१

७ आ. आवारातून प्रत्यक्ष देवळाकडे चालत जातांना भाव कसा ठेवावा ? ४२

**८. देवळाच्या पायऱ्या चढणे ४३**

८ अ. देवळाच्या पायरीला नमस्कार केल्याने काय लाभ होतो ? ४३

८ आ. एका हाताने नमस्कार करू नये, असे शास्त्र असतांना देवळाच्या पायरीला एका हाताने नमस्कार करणे योग्य आहे का ? ४६

**९. सभामंडपात प्रवेश करणे ४६**

**१०. सभामंडपातून गाभाऱ्याकडे जाण्याची पद्धत ४८**

**११. देवतेचे प्रत्यक्ष दर्शन घेण्यापूर्वी करायची कृती ५१**

११ अ. देवळातील घंटा वाजवतांना भाव कसा ठेवावा ? ५१

**१२. देवळात दर्शन घेण्याच्या संदर्भातील काही अनुभूती ५१**

**卐 परिशिष्ट – हिंदूंनो, हिंदूंच्या बहुसंख्य देवळांची दु:स्थिती दूर करण्यासाठी कृतीशील व्हा ! ५६**

## मनोगत

‘देवालय’ म्हणजे देवाचे आलय, म्हणजेच भगवंताचा साक्षात वास. ‘तेथे गेल्यावर आपले मागणे भगवंताच्या चरणी रुजू होते, मनःशांतीचा अनुभव येतो’, या श्रद्धेने भाविकजन देवळात जात असतात. ‘देव भावाचा भुकेला आहे’, असे म्हणतात. भक्तीभाव असलेल्याने देवळात देवाचे दर्शन कशाही पद्धतीने घेतले, तरी त्याला भगवंताच्या कृपेचा अनुभव हा येतोच; परंतु सर्वसाधारण भाविकात इतका भाव नसतो; म्हणून त्याने देवाचे दर्शन अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य पद्धतीने घेणे आवश्यक असते.

दिव्याभोवतीच्या काचेच्या वेष्टनावर काजळी धरली असल्यास ती स्वच्छ करावी लागते, तरच दिव्याचा लख्ख प्रकाश बाहेर पडू शकतो. तद्वतच देवाचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याआधी आपल्याभोवती असलेली रज-तमाच्या आवरणाची काजळी दूर करून भावाची ज्योत अंतरात जागृत करावी लागते, तरच ईश्वराकडून प्रक्षेपित होणार्‍या चैतन्यप्रकाशाचा आणि त्याच्या कृपाप्रसादाचा परिपूर्ण लाभ आपल्याला होतो. देवाचे दर्शन घेण्याच्या अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य पद्धतीने हे कसे साध्य होते, याविषयीचे ज्ञान या ग्रंथात दिले आहे. या ग्रंथात केवळ योग्य पद्धतच दिली नाही, तर ती तशी असण्यामागील सूक्ष्म-स्तरावरील अध्यात्मशास्त्रही दिले आहे. यामुळे त्या पद्धतीविषयी आणि पर्यायाने धर्मशास्त्राविषयी श्रद्धा निर्माण व्हायलाही साहाय्य होते.

पाय धुऊन देवळात प्रवेश का करावा; देवाचे दर्शन घेतांना कोणती प्रार्थना करावी; प्रदक्षिणा का, कशा अन् किती घालाव्यात यांसारख्या विविध प्रश्नांची अध्यात्मशास्त्रीय उत्तरे या ग्रंथात दिली आहेत.

या ग्रंथात सांगितलेल्या योग्य पद्धतीनुसार देवाचे दर्शन घेतल्यास, तसेच याविषयी लोकांचेही प्रबोधन केल्यास हा ग्रंथ लिहिण्याचे खरे सार्थक झाले, असे आम्ही समजू. तसे व्हावे ही श्री गुरुचरणी प्रार्थना.

**- संकलक**